आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता
९ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- कर्करोगावरची औषधं आणि नमकीन पदार्थांवरच्या जीएसटीमध्ये कपात, आरोग्य वीम्यावरचा जीएसटी कमी करण्याची मागणी जीएसटी परिषदेच्या मंत्री गटाकडे सोपवली

- भारत आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात अणुऊर्जा आणि पेट्रोलियमसह विविध क्षेत्रांमधले पाच करार

- महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरणमधल्या कंत्राटी कामगारांना १९ टक्के वेतनवाढ

**आणि**

- सुखोई ३० एमकेआय या लढाऊ विमानांच्या २४० इंजिनांच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालय आणि हिंदुस्तान एअरोनॉटिक्समध्ये करार

**<><><><><>**

कर्करोगावरच्या औषधांवरचा जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर १२ वरुन ५ टक्के करण्याचा निर्णय आज झाला. नमकीन आणि इतर पदार्थांवर १८ टक्क्यांऐवजी १२ टक्के जीएसटी लादण्याचा निर्णय झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. जीएसटी परिषदेच्या आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीनंतर त्या बोलत होत्या.

आरोग्य वीम्यावर लादलेला १८ टक्के जीएसटी कमी करण्याची मागणीवर नोव्हेंबरमध्ये निर्णय घेतला जाईल, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. हा मुद्दा मंत्र्यांच्या गटाकडे पाठवलेला आहे. त्यांना ऑक्टोबरपर्यंत शिफारशी सुचवायला सांगितल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

भारत आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात आज अणुऊर्जा आणि पेट्रोलियमसह विविध क्षेत्रांमधले पाच करार झाले. त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतभेटीवर आलेले अबुधाबीचे युवराज शेख खलिद बिन मोहमद बिन झायद अल नहयान यांच्याशी चर्चा केली. यावेळी भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातले संबध, तसंच नव्यानं पुढे येत असलेल्या क्षेत्रांमधे व्यापक धोरणात्मक भागीदारी वाढवण्याबाबत उभय नेत्यांनी विचारविमर्श केला.

शेख खलिद काल संध्याकाळीच दिल्लीत पोचले असून प्रधानमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर त्यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधीना अभिवादन केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट त्यांनी घेतली. उद्या ते मुंबईला येणार आहेत. दोन्ही देशांमधल्या उद्योजकांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमात ते सहभागी होतील.

**<><><><><>**

सौदी अरेबियात रियाध इथं आयोजित भारत -जीसीसी परराष्ट्रमंत्री परिषदेसाठी गेलेले परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी जीसीसी अर्थात, आखात सहकार्य परिषदेच्या सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी द्विपक्षीय बैठका घेतल्या. सौदी अरेबिया, कुवेत, बहारिन, ओमान, तसंच ब्राझीलच्या परराष्ट्रमंत्र्यांचीही त्यांनी भेट घेतली. द्विपक्षीय, विभागीय, आणि जागतिक मुद्यांवर त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

देशातल्या ग्रामीण आणि शहरी भागात १ लाख ६९ हजार आरोग्य उपकेंद्र, जवळपास ३२ हजार प्राथमिक आरोग्य केंद्र, आणि सहा हजारांपेक्षा जास्त सामुदायिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत अशी माहिती आरोग्य विभागानं प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी नवी दिल्लीत आज हा अहवाल प्रसिद्ध केला. याशिवाय १ हजार ३४० उपविभागीय आणि जिल्हा रुग्णालय, ७१४ जिल्हा रुग्णालय, ३६२ वैद्यकीय महाविद्यालय आहेत.

उपकेंद्रांमध्ये दोन लाखांपेक्षा जास्त आरोग्य कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ४१ हजार डॉक्टर आणि आरोग्य अधिकारी, तर सामुदायिक आरोग्य केंद्रांमध्ये २६ हजार विशेषज्ञ आणि आरोग्य अधिकारी सेवा देतात. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ४८ हजार तर सामुदायिक आरोग्य केंद्रांमध्ये ५१ हजार परिचारिका कार्यरत असल्याचं या अहवालात म्हटलं

आहे. देशभरातल्या उपविभागीय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये ४५ हजारांपेक्षा जास्त डॉक्टर आणि आरोग्य अधिकारी काम करतात.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबई दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं. त्यानंतर शहा यांनी मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. तसंच वांद्रे पश्चिम इथल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचं दर्शन घेऊन पूजा केली.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात कशारितीने गणेशोत्सव साजरा केला जातो हे तिथे राहत असलेल्या नागरिकांकडून आपण जाणून घेत आहोत. जपानमध्ये कशारितीने गणपती बाप्पाचं स्वागत आणि पूर्जा-अर्चा केली जाते, हे आपण आज जाणून घेणार आहोत. टोकियोमध्ये एका माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपनी काम करणाऱ्या प्राची धर्मे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**होल्ड बाइट प्राची धर्मे, जपान**

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागातल्या महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ करण्याची घोषणा ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. ही वाढ मार्च २०२४पासून लागू केली आहे.

या कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत सह्यादी अतिथीगृहात झालेल्या बैठकीत त्यांनी ही घोषणा केली. त्यामुळे आता राज्यातल्या ऊर्जा विभागात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचं वेतन हे अन्य राज्यांमधल्या कंत्राटी कामगारांपेक्षा सर्वांत जास्त झालं आहे. त्याबरोबरच आता या कंत्राटी कामगारांना ५ लाखापर्यंत आरोग्य विमा सुविधा लागू केली जात असल्याचंही फडनवीस यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

कोलकात्याच्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणी सुरू असलेल्या तपासाचा  ताजा अहवाल पुढच्या मंगळवारपर्यंत सादर करावा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज सीबीआयला दिल्या. सर्वोच्च न्यायालयानं याप्रकरणी स्वतःहून दाखल करून घेतलेल्या याचिकेची सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायाधीश जे बी पारडीवाला आणि  मनोज मिश्र यांच्या खंडपीठासमोर होत आहे.

**दरम्यान,** निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप मागे घेऊन उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत कामावर हजर व्हावं असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. या संपात सहभागी झालेल्या डॉक्टरांवर कोणतीही कायदेशीर कारवाई करु नये, तसंच डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी, अशी सूचना ही सर्वोच्च न्यायालयानं दिली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमध्ये सहाय्यक शिक्षक भरती परीक्षेद्वारे निवडलेल्या शिक्षकांची सुधारित यादी तयार करण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने आज स्थगिती दिली. ही परीक्षा २०१९मध्ये झाली होती. मात्र, या भरती प्रक्रियेत आरक्षण असलेल्या प्रवर्गांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालं नसल्याचा आरोप करत उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. त्यानंतर ६९ हजार साहाय्यक शिक्षकांची सुधारित यादी उत्तर प्रदेश सरकारनं तयार करावी असे आदेश उच्च न्यायालयानं दिले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकार आणि प्राथमिक शिक्षण मंडळाच्या सचिवांना नोटीस बजावली. या प्रकरणावरच्या याचिकांवर २३ सप्टेंबरपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होईल.

**<><><><><>**

मुंबईची ओळख असलेल्या डबेवाल्यांच्या कहाणीचा समावेश केरळमध्ये इयत्ता नववीच्या इंग्रजीच्या पुस्तकात केला आहे. ह्यू आणि कोलीन गॅन्टझर या प्रवासी-लेखक जोडप्यानं लिहिलेला हा लेख, सन १८९०मध्ये मुंबईच्या दादर भागातून दक्षिण मुंबईत नेण्यात आलेल्या पहिल्या डब्याची गोष्ट सांगतो.

**<><><><><>**

हरियाणातल्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टीने वीस उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यात बिजेंद्र हुड्डा हे रोहतक इथून तर इंदू शर्मा भिवानी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. उचना कलान मतदारसंघातून पवन फौजी आणि घरौंदा मतदारसंघातून जयपाल शर्मा निवडणूक लढवणार आहेत.

**<><><><>**

सुखोई ३० एमकेआय या लढाऊ विमानांच्या इंजिनांच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालयानं हिंदुस्तान एअरोनॉटिक्स बरोबर करार केला आहे. २६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाची ही २४० एएल- ३१ एफपी इंजिनं कोरापूट इथल्या कारखान्यात तयार होणार आहेत. वर्षाला ३० याप्रमाणे पुढच्या ८ वर्षात हिंदुस्तान एअरोनॉटिक्स २४० इंजिनांचा पुरवठा करेल. या उपक्रमात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचाही सहभाग असेल.

**<><><><>**

भारतीय नौदलासाठी तयार केलेल्या पाणबुडीविरोधी नौकांचं उद्घाटन आज सकाळी कोची इथल्या गोदीत झालं. आयएनएस मालपे आणि आयएनएस मुल्की अशी त्यांची नावं आहेत. उथळ पाण्यातल्या युद्धासाठी सक्षम अशा ५ नौका आता भारतीय नौदलाच्या ताफ्यात असून किनाऱ्यालगतच्या समुद्रात गस्त घालणं, तसंच शोध आणि बचावकार्यात हातभार लावण्याच्या उद्देशाने या नौका तयार करण्यात आल्या आहेत.

**//<><><><> //**